# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

## अधिसभा निवडणुकीसाठी नोंदणीकृत पदवीधरांची तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न)[(28(2)(t)] व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (**Registered Graduates**) अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८(३) च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली नोंदणीकृत पदवीधर मतदारांची तात्पूरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहीत) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.

सदर तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी **गुरुवार, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ ते सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ पर्यंत** स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे :**

१. संबंधित व्यक्तीने विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Online Registrations मधील Registered Graduates खालील Track my Application या link वर क्लिक करावे.

२. येथे पदवीधर मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी केलेला अर्ज ॲप्लीकेशन आयडी / नाव / ई-मेल आयडी / मोबाईल नंबर यापैकी कोणताही एक तपशील भरुन शोधावा.

३. अर्ज पाहण्यासाठी नोंदणी अर्जामध्ये नमुद केलेल्या मोबाईल नंबरवर OTP पाठविला जाईल. सदर OTP verify झाल्यानंतर अर्जदाराला नोंदणी अर्ज आणि त्यासोबत अपलोड केलेले सर्व दस्तऐवज पाहता येतील व अर्जदाराला विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहीत) पडताळून पाहता येईल.

४. अर्जदाराला तात्पुरत्या मतदार यादीमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर अर्जदाराने तेथे उपलब्ध करुन दिलेल्या रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी.

नोंदणीस अपात्र ठरलेल्या अर्जांबाबत कोणतेही दस्तऐवज अथवा कागदपत्रे नव्याने अपलोड करता येणार नाहीत किंवा स्विकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/८३
दिनांक : ०७/०९/२०२२